P-27

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६<br>२६०५८७३९<br>२६०५८१३९<br>२६०५८४७६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे,पुणे<br>फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८१५९.<br>ई-मेल नं.rch.jsy@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/जशिसुका/वाहन सेवा/न.क्र.४१७ / कक्ष क्र १८ब/ २१९९२-२२१०/ /१२/<br>दि.५/१/२०१२ |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............(सर्व)

२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय ............(सर्व)

विषय:- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमा अंर्तत मोफत वाहतुक सेवा उपलब्ध करतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम ७ ऑक्टोबर २०११ पासून राज्यात कार्यान्वीत करण्यात आला आहे. यामध्ये प्रसुतीसाठी मातेला आणि ३० दिवसापर्यन्तच्या आजारी नवजात अर्भकास आरोग्य संस्थेमध्ये दाखल करीत असतांना, घरापासून शासकिय आरोग्य संस्थेत, आरोग्य संस्थेपासून दुस-या आरोग्य संस्थेत संदर्भ सेवेसाठी तसेच,उपचारानंतर आरोग्य संस्थेपासून घरापर्यन्त सोडण्यापर्यन्त मोफत आरोग्य सेवा व मोफत वाहन सुविधा पुरविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ सेवेसाठी एका आरोग्य संस्थेतुन दुस-या आरोग्य संस्थेत रुग्णास वाहनातुन सोडण्यात येते. या वाहनाच्या वाहन चालकाने संबंधीत आरोग्य संस्थेच्या संस्था प्रमुखांना भेटल्याशिवाय वाहन परत नेवू नये. त्यामुळे त्यावेळी संबंधीत आरोग्य संस्थेमधून डिस्चार्ज देण्यात आलेल्या आपल्या मूळ आरोग्य संस्थेअंतर्गत गावामधील रुग्ण असल्यास अथवा मूळ आरोग्य संस्थेच्या वाटेवरील गावांमध्ये सोडावयाचा रुग्ण असल्यास अशा लाभार्थीना त्याच वाहनातुन परतीच्या प्रवासाचेवेळी घरापर्यन्त सोडण्यात यावे. यामुळे कांही ठिकाणी वेगळया वाहनाची आवश्यकता भासणार नाही.

आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व आरोग्य संस्थांना उपरोक्त सूचना तात्काळ देण्यात याव्यात, व केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

O/C
5.1.2012.

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा
राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे.

प्रत :- उपसंचालक आरोग्य सेवा, विभागीय मंडळ ....(सर्व)

२/- आपण आपल्या अधिनस्त जिल्ह्यांना व कार्यक्षेत्रात फिरती कार्यक्रमाचे वेळी व मासिक आढावा सभेमध्ये याबाबत सूचना द्याव्यात व वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

प्रत सादर:- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ....(सर्व)

प्रत सविनय सादर:-

१) मा. संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य मुंबई

२) मा. आयुक्त, (कु.क.) व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई

३) मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.

अति. संचालक, आ. सेवा (कु.क)
मा. बा. सं. व. शा. आ., पुणे
7 JAN 2012
क्र.: 21992-2210